संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# अधम मार्गापेक्षा सुवर्णमध्य साधण्याचा प्रयत्न

कोणत्याही व्यवहारात अधम मार्गापेक्षा मध्यम मार्ग किंवा सुवर्णमध्य योग्य ठरतो. राज्यातल्या आर्थिक परिस्थितीला हातभार लावणाऱ्या व्यापाऱ्यांचे समाधान करायचे असेल आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक स्थिती टिकवायची असेल तर सुवर्णमध्य काढणे आवश्यक होते. सरकारने आता एलबीटी रद्द करून स्थानिक स्वराज्य संस्थांना वेगळ्या पध्दतीने पैसा उपलब्ध करून देण्याचा मार्ग शोधला आहे.प्रत्येक शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर मुद्रांक नोंदणी होत असते.जागा किंवा मालमत्तांच्या खरेदीविक्रीचे व्यवहार होताना प्रत्येकाला मुद्रांक नोंदणी करणे सक्तीचे आहे. या मुद्रांक शुल्कातून रोज बऱ्यापैकी महसूल गोळा होतो. हा सगळा पैसा राज्य सरकारच्या तिजोरीत जमा होतो. खरे तर मालमत्ता किंवा घर, फ्लॅट, बंगला किंवा इतर आर्थिक व्यवहार झाल्यानंतर त्याच्याशी स्थानिक स्वराज्य संस्थांचा जवळचा संबंध असतो.उदाहरणार्थ मुंबई ठाणे, पुणे, कल्याण अशा सगळ्या मोठ्या शहरांमध्ये रोज काही कोटी रुपये मुद्रांक शुल्कामधून सरकारकडे जमा होतात.कारण आज जवळपास दहा बारा टक्के मुद्रांक नोंदणी सरकार घेत असते.इतक्या मोठ्या प्रमाणावर पैसा गोळा होत असताना त्यातला कुठलाच हिस्सा स्थानिक संस्थांना, नगरपालिकांना मिळत नाही. आता सरकारने असे ठरवले आहे की, या मुद्रांक नोंदणीतला काही टक्के भाग हा स्थानिक स्वराज्य संस्थांना द्यायचा. म्हणजे एलबीटी रद्द केल्यानंतर या स्थानिक स्वराज्य संस्थांचे जे काही आर्थिक नुकसान होणार होते ते टळू शकेल. कारण एलबीटी रद्द केल्यानंतर त्यांना मिळणारे आर्थिक उत्पन्न मोठ्या प्रमाणावर कमी झाले होते. किंबहुना त्यातून होणारे आर्थिक नुकसान परवडणारे नाही. आणि त्यातून स्थानिक स्वराज्य संस्थांचे आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणावर होणार होते. कारण यापूर्वीसुध्दा जकात कर रद्द केल्यामुळे त्याचा फटका स्थानिक स्वराज्य संस्थांना बसला होता. आता एलबीटीपण रद्द केल्यानंतर त्यांना मिळणाऱ्या आर्थिक उत्पन्नावर गदा येणार होती. हा विचार करून त्यांचे आर्थिक नुकसान कसे टाळता येईल याच्या पर्यायांचा शोध सुरू होता. अखेरीस नोंदणीशुल्कातला काही टक्के भाग स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्याचा निर्णय म्हणजे या सगळ्या संकटातून सुवर्णमध्य काढण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. ही सगळी योजना प्रत्यक्ष कार्यान्वित व्हायला वेळ जाईल. परंतु त्याची जर व्यवस्थित अंमलबजावणी झाली तर स्थानिक स्वराज्य संस्थांचे नुकसान टाळता येऊ शकेल.

## एक चांगला मार्ग

खरे तर हा पर्याय यापूर्वीच सुचवला गेला होता.कारण मालमत्ता किंवा घरांची खरेदी-विक्री झाल्यानंतर जे मुद्रांक शुल्कातून उत्पन्न मिळते ते अक्षरशः कोट्यवधींच्या स्वरूपात असते. म्हणजे ज्या मालमत्तांच्या बांधकामासाठी किंवा घर, इमारती, उभ्या करताना सगळ्या परवानग्या नगरपालिका किंवा महापालिकेकडून घेतल्या जातात.पाण्याची जोडणी नगरपालिका देते. एवढेच नव्हे तर त्या त्या परिसरामध्ये रस्ते, किंवा स्वच्छता आरोग्य उपलब्ध करून देण्याचीही व्यवस्था महापालिकेलाच करावी लागते. त्यावर त्यांचा बराच मोठा खर्च होत असतो. केवळ मालमत्ता करातून किंवा पाणीपट्टीतून हा खर्च भागवता येणे शक्य नाही.आतापर्यंत जकात कर किंवा एलबीटी हे सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्पन्नाचे मोठे साधन होते.मात्र या सगळ्या करांच्या वसुलीमध्ये पारदर्शकता आणि सुसूत्रता नसल्यामुळे तो कर भरणाऱ्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता. त्यामध्ये होणारा भ्रष्टाचार गैरव्यवहार, आणि अधिकारशाहीची दंडेली याचा त्रास वाढल्यामुळे व्यापाऱ्यांनी या करांना विरोध केला होता.आता एलबीटी जाऊन व्यापाऱ्यांना फक्त विक्री कर आणि प्राप्तीकर असे दोनच कर भरावे लागतील. म्हणजे त्यांना आपल्या व्यवसायाबाबत अधिक चांगल्या पध्दतीने लक्ष केंद्रित करता येऊ शकेल. यामध्ये कर गोळा करताना नगरपालिकांकडून चांगल्या प्रशासकीय व्यवस्थेपेक्षा त्रासदायक नोकरशाहीचाच अनुभव येत होता. त्यासंदर्भामध्ये व्यापारी संघटनांनी वेळोवेळी सरकारकडे तक्रारी केल्या होत्या. एवढेच नव्हे तर त्यात असलेल्या त्रुटी लक्षात आणून दिल्या होत्या. अनेक वर्षांच्या पाठपुराव्यानंतर सरकारला या गोष्टीचे महत्त्व पटलेले दिसते. व्यापारी म्हणजेच चोरीमारी व्यापारी म्हणजे लबाडी अशीच साधारणपणे त्यांची प्रतिमा झालेली आहे. त्याला काही प्रमाणात व्यापारी दोषी आहेतच. परंतु सगळ्यांनाच एकाच जात्यामध्ये भरडून त्रास दिला जात होता. एकूणच सरकारची उद्योग व्यवसाय आणि व्यापार या गोष्टीकडे बघण्याची दृष्टी बदलावी असा प्रयत्न होता.

## रोजगार वाढ महत्त्वाची

एक गोष्ट मात्र निश्चत आहे की, या मुद्रांक नोंदणी शुल्कातून नगरपालिका किंवा महापालिकांना चांगले उत्पन्न मिळू शकेल किंबहुना अनेक छोट्या नगरपालिकांना एलबीटीतून गोळा होणाऱ्या महसुलापेक्षा जास्त उत्पन्नाची हमी प्राप्त होईल. सरकारी तिजोरीमध्ये एकमार्गी जमा होणारा हा महसूल स्थानिक स्वराज्य संस्थांवर तसा अन्याय करणाराच ठरत होता.अर्थात भविष्यकाळात देशभर जीएसटी नावाची एकच करप्रणाली लागू होणार आहे. त्यातून बऱ्यापैकी उत्पन्न किंवा महसूल स्थानिक स्वराज्य संस्थांना मिळू शकेल. अलिकडे तर या जीएसटीमुळे  राज्य सरकारांचे जे नुकसान होईल. तेसुध्दा भरून देण्याची पाच वर्षांची हमी केंद्र सरकारने घेतली आहे. याचा अर्थ राज्याच्या तिजोरीवर कोणताही मोठा भार पडणार नाही. आणि मग त्याचा काही प्रमाणात स्थानिक स्वराज्य संस्थांनादेखील लाभ देता येऊ शकेल. नवे सरकार आल्यापासून उद्योगांची वाढ कौशल्यविकास किंवा व्यापार व्यवसाय करणाऱ्यांना प्रोत्साहन असे एक आश्वासक वातावरण निर्माण केले जात आहे. त्याचे स्वागत केले पाहिजे. केवळ करवसुली किंवा सरकारच्या लालफितीचा कारभार प्रगतीच्या आड येऊ नये याची काळजी घेतली जात आहे. जकात कर किंवा एलबीटी रद्द केल्यामुळे आमचे नुकसान होईल असे कारण पुढे करून उद्योगव्यवसायाची वाढ रोखली जात होती. त्यांच्या आर्थिक उत्पन्नापेक्षा समाजातल्या रोगजाराचे उत्पन्न वाढणे जास्त गरजेचे ठरते.